तक्रार युएलपी क्र. ०७/२०२४
निशाणी क्रं.यू—७

**जाबदारातर्फे ॲड. श्री.डी.एस.जोशी यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, जुन २००८ मध्ये मला अर्धांगवायूचा झटका आला होता. हे म्हणणे खरे आहे की, आजारपणानंतर मी जानेवारी २००९ मध्ये कामावर रूजू झालो. हे म्हणणे खरे आहे की, मी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी कारखान्याकडे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला कारखान्याकडून वैद्यकीय खर्चाची रक्कम रू.२२४९१/— मिळाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुरक्षा रक्षक म्हणून गेट क्र. १ वर कष्टाची कामे करीवी लागतात त्याचप्रमाणे जाणा—या येणा—यांची तपासणी, मालाची तपासणी करावी लागते. सुरक्षा रक्षकाचे काम तिनही पाळीत चालते. हे म्हणणे खरे आहे की, अर्धांगवायुमूळे मला कमी कामाच्या ठिकाणी पाठवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, नर्सरीमध्ये फक्त दिवसपाळी काम होते. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याने मला आजारपणामुळे सांभाळून घेतले होते.

हे म्हणणे खरे आहे की, विप कारखान्याचा स्वतंत्र दवाखाना असून डॉ. चव्हाण हे कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला १२/०३/२०२० रोजी डॉ. चव्हाण यांच्याकडे वैद्यकीय तपासणीसाठी पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी डॉ. चव्हाण यांच्यामार्फत वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वैद्यकीय प्रमाणपत्र कारखान्यास पोहोच झाले आहे याबाबतचा पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५/०६/२०२० रोजी मला कारखान्याने वैद्यकीय तपासणी साठी पत्र दिले होते व त्यावर माझी सही आहे. माझा पगार जिल्हा मध्यवर्ती बॅकेत जमा होत होता आणि त्याची मला स्लीप मिळत होती. मार्च २०२० चा संपुर्ण पगार मिळाल्याचे मला आठवत नाही.

विप कारखान्यामध्ये कामगारांची संघटना होती. हे म्हणणे खरे नाही की, मला कामावर घेत नाहीत तोंडी हुकूमाने कमी केले म्हणून संघटनेकडे अथवा संघटने मार्फत विपकडे तक्रार केली नाही. तसा कोणताही कागद मी दाखल केला नाही. मी

सरकारी कामगार अधिका—याकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला विप कारखान्याने तोंडी हूकूमाने कमी केले नसल्यामुळे मी संघटनेकडे अथवा संघटने मार्फत कारखान्याकडे त्याचप्रमाणे सरकारी कामगार अधिका—याकडे तक्रार केली नाही. मी मार्च २०२० पासून जुन २०२३ पर्यंत विप कारखान्याच्या निवासस्थानामध्ये राहात होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी निवृत्त होणार आहे म्हणून विलंबाने १८/०५/२०२३ ला तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी निवृत्त होईपर्यंत काम करू शकत नसल्यामुळे कामावर हजर होण्यासाठी गेलो नाही आणि तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मला तोंडी हुकूमाने कामावरून कमी केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, विप कारखान्याने सांगितलेल्या प्रमाणे मी पुर्तता केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील परिच्छेद क्र. ५ मध्ये खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी विप कारखान्यास वैद्यकीय दाखला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार, खोटे शपथपत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

कोल्हापूर.
दिनांकः— ३०/०१/२०२६

( के. बी. कामगौडा )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.